# मुंबई विद्यापीठ

## विद्यार्थी कल्याण विभाग

क्र. वि.क.वि./४०/२०१६

डॉ. सुनिल पाटील .
संचालक,

विद्यापीठ विद्यार्थी भवन,
'ब' पथ, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.

परिपत्रक :

**विषय : मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत (आर्थिक सहाय्य) मिळण्याबाबत .....**

महोदय / महोदया,

विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातील मागासवर्गीय (अनुसुचित जाती /अनुसुचित जमाती /विमुक्त जाती /भटक्या जाती ) विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य ही योजना शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ या वर्षासाठी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

तरी आपणास विनंती करण्यात येते की आपल्या विभागातील अनुसुचित जाती /अनुसुचित जमाती /विमुक्त जाती /भटक्या जाती या वर्गाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत (आर्थिक सहाय्य) मिळण्यासाठी सोबत जोडलेल्या नमुन्यातील अर्ज विद्यार्थ्यांकडून भरून घ्यावेत. सदर अर्ज खालील सर्व गोष्टींची पूर्तता करून **सोमवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत** आपल्या शिफारीशींसह या कार्यालयास पाठवावेत. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**अर्ज सादर करताना खालील गोष्टींची पूर्तता करणे अपेक्षित आहे :**

१. अर्ज विद्यार्थ्यांनी स्वत: भरून दयावा.
२. प्राधिकृत अधिकाऱ्यांने दिलेल्या जातीच्या प्रमाणित पत्राची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.
३. मागील वर्षाचे कुटुंबाच्या उत्पन्नाचा प्राधिकृत आधिका-याने दिलेला दाखला जोडणे आवश्यक आहे कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रुपये ४,००,०००/- पेक्षा जास्त नसावे. (पालकांचे उत्पन्न कायम स्वरुपी नसल्यास त्या बाबत प्राचार्यानी दाखला दयावा)
४. सन् २०१६-२०१७ मध्ये शैक्षणिक शुल्क भरलेल्या पावतीची प्रमाणित सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
५. विद्यार्थ्यांनी ज्या कारणासाठी आर्थिक सहाय्य मागितले आहे त्याची पुर्तता व खात्री विभागप्रमुख यांनी करून घ्यावयाची आहे.
६. प्रबंध /निर्बंध सादर करण्याची शुल्क, परिषद, चर्चासत्र इत्यादीसाठी उपस्थित राहण्यासाठीचा खर्च यासंबंधी आर्थिक सहाय्याची मागणी करताना आवश्यक ते पुरावे सादर करणे गरजेचे आहे.
७. दिलेल्या वेळेत अर्ज सादर करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची व विभाग प्रमुखांची राहिल.
८. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाच्या ओळखपत्राची **(Identity Card)** छायांकितप्रत अर्जासोबत जोडावी.
९. आधार कार्डाची छायांकितप्रत अर्जासोबत जोडावी.

**विभागप्रमुखांसाठी सूचना :**

अ. विद्यार्थ्यांना सदर अर्ज व योजनेची माहिति ठळकपणे विभागात प्रसिध्द करावी. अर्जाचा नमूना विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावा.
ब. विभागप्रमुखांनी अर्ज सादर करताना वरील सर्व गोष्टींची पूर्तता झाली आहे का याची खात्री करावी. अन्यथा अर्ज स्विकारला जाणार नाही.
क. विभागातील सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची सोबत दिलेल्या तक्त्यात माहिति भरून दयावी. माहिति पूर्ण नसल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
ड. विभागात उपलब्ध असलेल्या सर्व अभ्यासक्रमांची माहिति व त्यासाठी आकारण्यात येणाऱ्या विविध शुल्कांची तपशिलवार माहिती सोबतच्या अर्जात भरून पाठवावी.
इ. अपूर्ण अर्जाचा आणि दिनांक **३१ ऑक्टोबर, २०१६** नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
ई. १ सप्टेंबर, २०१६ या शैक्षणिक वर्षात वयोमर्यादा २५ व त्या आतील असलेल्या विद्यार्थ्यांना हया योजनेचा लाभ घेता येईल.

( डॉ. सुनिल पाटील )
संचालक

मुंबई - ४०० ०२०
दिनांक : ०४ ऑक्टोबर,२०१६